# सातारा शहर पोलीस ठाणे

७६, मल्हारपेठ, सातारा – ४१५ ००१ (Maharashtra)

फोन क्रमांक – ०२१६२ २३०५८०

(ईमेल - sataracityps.satara@mahapolice.gov.in)


---

**प्रेस नोट दिनांक २४/०९/२०२५.**

**( गणेशोत्सव २०२६ अनुषंगाने सातारा शहर परिसरामध्ये सातत्याने शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्दचे गुन्हे करणा-या इसमांस सातारा पोलीसांनी सहा महिन्या करीता केले तडीपार )**

सातारा जिल्ह्यातील सातारा शहर पोलीस ठाणे हद्दीतील सातत्याने शरिराविरुध्चे तसेच मालमत्तेविरुध्दचे गुन्हे करणारा सराईत इसम नामे संतोष अशोक लंकेश्वर रा.प्रतापसिंहनगर खेड सातारा ता.जि.सातारा यांचेवर खुनाचा प्रयत्न करणे, घातक हत्यारांनी इच्छापुर्वक दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन दंगा करणे, दमदाटी शिवीगाळ करणे असे गुन्हे दाखल असल्याने सातारा शहर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री सचिन म्हेत्रे यांनी सदर इसमा विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे संपुर्ण सातारा जिल्ह्यातून दोन वर्षे तडीपार करणे बाबातचा प्रस्ताव मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी सो सातारा उपविभाग सातारा यांचेकडे सदर केला होता. सदर प्रस्तावाची चौकशी श्री विपुल पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग सातारा यांनी केली होती.

सदर इसमावर दाखल असले गुन्हेमध्ये त्याचेवर वेळोवेळी अटक तसेच प्रतिबंधक कारवाई करून ही त्याचे गुन्हे करणेचे प्रवृत्ती कोणताही बदल झाला नाही. सदर इसम हा सातारा शहर परिसरामध्ये सातत्याने गुन्हे करीत होता. त्याचेवर कायदा कोणताच धाक न राहिले मुळे सातारा शहर व परिसरातील लोकांना मोठा प्रमाणावर त्याचा उपद्रव होत होता. त्याचेवर सर्व सामान्य जनतेमध्ये कडक कारवाई करणेची मागणी होत होती.

मा. अशिष बारकुल उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी सातारा उपविभाग सातारा यांचे समोर हद्दपार इसम नामे संतोश अशोक लंकेश्वर रा.प्रतापसिंहनगर खेड सातारा ता. जि. सातारा. याची सुनावणी होवून सदर हद्दपार इसमास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६(१)(अ)(ब) अन्वये सातारा जिल्ह्यातून सहा महिने करीता हद्दपारीचा आदेश पारीत केला आहे.

सातारा शहरा मध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे करीता सातारा शहरातील सराईत गुन्हेगारांचे विरुध्द हद्दपारी , मोक्का, एमपीडीए, अशा प्रकारच्या कडक कारवाई करणेत येणार आहे.

याकामी मा. निखील पिंगळे पोलीस अधिक्षक सो सातारा, श्रीमती वैशाली कडुकर विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक सो, यांचे मार्गदर्शनाखाली सातारा शहर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री सचिन म्हेत्रे वरिष्ठ पोलीस निरीक्षक , तसेच स्थानिक गुन्हे शाखा सातारा येथील पो.हवा. अमित सपकाळ, सातारा शहर पोलीस ठाणेचे पो.हवा. संदिप पवार, दिपक इंगवले, म.पो.कॉ.निता चव्हाण यांनी सुनावणीकामी योग्य पुरावा सादर केला तसेच उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाचे सहायक महसुल अधिकारी महेश गंगातिर्थ महसुल सहायक अभय पवार यांनी कारवाईस योग्य ती मदत केली..

---

प्रति, : - संपादक ------ पोलीस निरीक्षक सातारा शहर सातारा.

आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द व्हावे.